सकाळ
दि. 11/08/2025

# शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे स्मृती ज्योत

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ९ : शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या ३८ व्या स्मृतिदिनानिमित्त बापूजी साळुंखे स्केटिंग प्रशिक्षण केंद्राच्यावतीने स्मृती ज्योत मिरवणुकीने स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या प्रांगणात आणली. ज्योत जुन्या विवेकानंद कॉलेज (जुना बुधवार पेठ) येथे त्यांच्या स्नुषा इंदिराबाई साळुंखे हस्ते व ऐश्वर्या साळुंखे यांच्या उपस्थितीत प्रज्वलित केली. यावेळी कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, प्राचार्या शुभांगी गावडे, कौस्तुभ गावडे यांनी अभिवादन केले. स्केटिंग प्रशिक्षक डॉ. महेश कदम, भास्कर कदम, ॲड. धनश्री कदम, योगिता घोरपडे, सागर कुंभार, मेघशाम जगताप उपस्थित होते.

सकाळ
दि. 11/08/2025

# कोल्हापुरी बोली




प्रत्येक भागाची विशिष्ट बोलीभाषा असते. ती प्रमाणभाषेपेक्षा थोडी वेगळी असून, तिच्या शब्दसौंदर्याला त्या भागातील मातीचा सुगंध असतो. याचप्रमाणे 'कोल्हापुरी बोली : तत्त्व आणि व्यवहार' या पुस्तकात प्रा. डॉ. एकनाथ आळवेकर यांनी कोल्हापूरच्या बोलीभाषेविषयीची सविस्तर माहिती दिली आहे. कोल्हापुरी बोलीबद्दलची वैशिष्ट्ये टिपत असताना त्यांनी या बोलीचा उगम, परिचय, व्यवहार, वापर या मुद्द्यांवरही प्रकाश टाकला आहे. कोल्हापुरी बोलीची सैद्धान्तिक चर्चा करत असताना त्यांनी आपली मांडणी बोजड होऊ दिलेली नाही.

- **वैशिष्ट्य :** कोल्हापुरी बोलीतील, शब्द, त्यांचा अर्थ, म्हणी, वाक्प्रचार यांची यादी व उपयोग.
- **प्रकाशक :** तेजश्री प्रकाशन
- **पृष्ठे :** १०० ● **मूल्य :** १८० रु.

पुढारी | ४
सोमवार । ११ ऑगस्ट २०२५

# विवेकानंद महाविद्यालयातील वेबिनारला प्रतिसाद

**कोल्हापूर :** विवेकानंद महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने 'परदेशातील उच्च शिक्षण संधी' या विषयावर वेबिनार झाला. यास विद्यार्थ्यांचा प्रतिसाद लाभला. वेबिनारमध्ये ॲचिव्हर्स ॲकॅडमीच्या पल्लवी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. देसाई यांनी विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षण घेताना येणाऱ्या संधी, करिअरच्या दृष्टीने फायदे तसेच सांस्कृतिक अनुभव याविषयी माहिती दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार होते. अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षच्या समन्व्यक डॉ. श्रुती जोशी, रजिस्ट्रार एस. के. धनवडे यांचे मार्गदर्शन लाभले. प्रमुख पाहुण्यांची ओळख वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. बी. टी. दांगट यांनी करून दिली. डॉ. ए.आर. कासारकर यांनी आभार मानले. वनस्पतीशास्त्र विभागातील डॉ. प्रिया पाटील व डॉ. स्नेहल वाडकर यांनी सूत्रसंचालन केले. वेबिनारमध्ये महाविद्यालयातील शंभरहून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.